# सातारा नगरपरिषद, सातारा जिल्हा - सातारा

जा.क्र./सानप/संगणक/५९२०१८००००००९७७
सातारा नगरपरिषद, सातारा, दि. ०३/०५/२०१८

## अधिसूचना

संदर्भ - १. सन २०१५ चा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश क्र. ५
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. एससीओ - २०१५/प्र. क्र. १८९/नवि १४ दिनांक २३ जून २०१५

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम - ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसूचित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सातारा नगरपरिषद क्षेत्रातील पात्र नागरिकांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिने खालीलप्रमाणे लोकसेवा अधिसूचित करण्यात येत आहेत. तसेच त्यांची अंमलबजावणी करणारे पदनिर्देशित अधिकारी, तसेच या सेवा वेळेवर न पुरविल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि विहीत कालमर्यादा अधिसूचित करून जाहीर प्रगटन करण्यात येत आहे.

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५
### कलम - ३ अन्वये नगरपालिका (अ वर्ग) ने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील

| अ. क्र. | लोक सेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकरी | द्वितीय अपिलीय प्राधिकरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | बाळ जन्मल्यापासून २१ दिवसांच्या आत विनामूल्य<br>२१ दिवसानंतर,<br>जन्मदाखला प्रति प्रत रु. ३०/-<br>नाव नोंदणी रु. १०/- | ३ दिवस | जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभागप्रमुख) | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २ | मृत्यू प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | मृत्यू दाखला प्रति प्रत रु. ३०/- | ३ दिवस | ---''--- | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५. ९० दिवसानंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | १. विवाहापासून ९० दिवसांच्या आत रु. ५०/-<br>२. विवाहापासून ९० दिवस ते १ वर्षाच्या आत रु. १५०/-<br>३. विवाहापासून १ वर्षानंतर ५५०/- | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभागप्रमुख) | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४ | मालमत्ता कर उतारा देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रती प्रत रु. २००/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहित नमुन्यातील अर्ज | रु. १००/- | ३ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदीखत/ बक्षीसपत्र/ वाटणीपत्र व इतर) | रु. ६०/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे. | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारस हक्क प्रमाणपत्र | रु. ६०/- | १५ दिवस | संबंधित विभाग प्रमुख | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७ | झोन दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | रु. १००/- | ७ दिवस | नगररचनाकार | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/ सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | रु. २००/- | ३ दिवस | नगररचनाकार | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ९ | बांधकाम परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारद यांचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. आर. सी. सी. कन्सल्टंट यांचे प्रमाणपत्र<br>५. बांधकाम आराखडा<br>६. नकाशा ५ प्रती<br>७. मोजणी नकाशा<br>८. मंजूर रेखांकनाची प्रत | १. विकास कर - रहिवास रु. ३०/- वाणिज्य रु. ६०/- प्रति चौ. मी.<br>२. सुरक्षा अनामत = बांधकाम क्षेत्र x रु. १००/-<br>३. बांधकाम कल्याण उपकर = बांधकाम क्षेत्र x चालू बाजार मूल्य बांधकाम दर x१%<br>४. बंद बाल्कनी प्रिमियम = बंद बाल्कनी क्षेत्र x चालू बाजार मूल्य बांधकाम दर x१०%<br>५. डबल हाईट टेरेस प्रिमियम = डबल टेरेस क्षेत्र x चालू बाजार मूल्य बांधकाम दर x ४०%<br>६. अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक प्रिमियम = अतिरिक्त चटई निर्देशांक क्षेत्र x चालू बाजार मूल्य बांधकाम दर x ६०%<br>७. बांधकाम साहित्य अनामत वैयक्तिक बांधकाम रु. २०००/-<br>ओनरशिप रु. १०,०००/-<br>वृक्ष अनामत रु. ५००/- | ६० दिवस | नगररचनाकार | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १० | जोते प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज | विनामूल्य | १५ दिवस | नगररचनाकार | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |